# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW/ 165 /2015** **Dt:21 / 10/2015**

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय: ''वाचन प्रेरणा'' वृध्दींगत होण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

संदर्भः— शासन परिपत्रक क्रमांक:बैठक-२४१३/(प्र.क्र.१४०/१५)/समन्वय दि. ०९/१०/२०१५

महोदय/महोदया,

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि. १५ ऑक्टोबर हा जन्मदिन, ''वाचन प्रेरणा दिवस'' म्हणून सर्वत्र साजरा करण्यात आला. वाचन प्रेरणा वृध्दींगत होण्यासाठी महाविद्यालयांनी ग्रंथपालाच्या खालील उपक्रमांचे सहाय्याने आयोजन करावे.

१. विद्यार्थ्यांनी किमान किती पुस्तके, किती कालावधीत वाचावीत याबाबतचा कृती आराखडा महाविद्यालयांनी ठरवावा व त्यानुसार वाचन उपक्रम राबवावा.
२. महाविद्यालयांनी स्वतंत्ररित्या वाचन/प्रबोधन कार्यक्रम आयोजित करावे.
३. महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा अधिकाधिक उत्स्फूर्त सहभाग असेल अशा पध्दतीने कार्यक्रमाची आखणी करण्यात यावी.
४. सार्वजनिक ग्रंथालये लोकांच्या मदतीने बळकट करण्यात यावीत.
५. ग्रंथालयातील वाचन संस्कृती वाढीसाठी ग्रंथपाल यांनी विशेष कार्यक्रम आयोजित करावेत.
६. ग्रंथालयांमध्ये खुले ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात यावे.
७. WhatsApp, Internet, Facebook, Twitter या माध्यमातून वाचन प्रेरणा मिळेल अशा सूचना प्रसारित करण्यात याव्यात.
८. विविध क्षेत्रातील सुप्रसिध्द व्यक्ती (सेलिब्रिटीज) ज्यांचा वाचक म्हणूनही लौकिक आहे, त्यांचे सहकार्य घेऊन, आयोजित कार्यक्रम यशस्वी करण्यात यावेत.
९. व्याख्यान, भाषण, चर्चासत्र, सामूहिक वाचन, अभिवाचन, वाचन अनुभव कथन, ग्रंथ प्रदर्शन, विविध स्पर्धा इत्यादींपैकी सुयोग्य उपक्रम राबविण्यात यावेत.
१०. विद्यार्थी, शिक्षक, सर्व सामान्य वाचक याव्यतिरिक्त मित्र, कुटुंबातील सदस्य यांनी एकमेंकाना किमान एक पुस्तक भेट म्हणून द्यावे.
११. महाविद्यालयातील ग्रंथालयांना प्रत्येकाने किमान एक वाचनीय/प्रसिध्द पुस्तक भेट द्यावे.

वरील नमूद उपक्रमांचे आयोजन करुन वाचन संस्कृती व वाचन प्रेरणा वाढीस लागावी यासाठी प्रयत्न करावा, ही विनंती.

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली